Pune Police

# प्रेसनोट

दिनांक ३१/१०/२०१७ रोजी सकाळी ०८.००वाजता सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त राष्ट्रीय एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीची सरदार वल्लभभाई पटेल यांचे प्रतिमेस पुष्पहार घालुन बी.जे.मेडीकल ग्राऊंड येथुन सुरवात होवून, नेहरु मेमोरिअल चौक - लाल मंदीर – सिरम इस्टिटयुट – मित्तल कोर्ट - समर्थ पोलीस स्टेशन - रास्तापेठ एमएसइबी चौक - संतकबीर चौक - लक्ष्मी रोडने सरळ - अलका टॉकीज चौक – खंडोजी बाबा चौक – गुडलक चौक – ज्ञानेश्वर पादुका चौक – शिवाजीनगर पोलीस ठाणे गेटमधुन - पोलीस मुख्यालय , शिवाजीनगर, पुणे शहर येथे पोहचलेनंतर मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे सह मा.पोलीस सह आयुक्त, मा.अप्पर पोलीस आयुक्त, प्रशासन, मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे, मा.अप्पर पोलीस आयुक्त,दक्षिण प्रादेशिक विभाग, तसेच पोलीस उप-आयुक्त परिमंडळ – १, २, ३,४, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, वाहतुक शाखा, विशेष शाखा १ व २, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय १ व २ यांचे उपस्थितीत राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेवून विसर्जन करण्यात आली.

सदर रॅलीमध्ये प्लॉटुन कमांडर यांचेसह २० पोलीस उप-निरीक्षक, व पुणे शहर पोलीस पुरुष व महिला प्लाटुन, वाहतुक शाखा, पुणे ग्रामीण, पुणे रेल्वे, होमगार्डचे प्लाटुन, वाहतुक शाखेकडील हेल्मेटधारी मोटार सायकलचे १ प्लाटुन व बीट मार्शलचे १ प्लाटुन सहभागी होते.

